**अपील नामा**

**(ग्राहक संरक्षण कायदा  कलम 15 प्रमाणे)**

**अपील क्रमांकः**

**मुंबई येथील महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,**

**मुंबई यांचे समोर.**

नाव - ........ अपिलकर्ता

वय -

व्यवसायः-

पत्ता --

(मूळ तक्रारकर्ता/ विरुध्द पक्षकार)

**विरुध्द**

नाव - ........ जाब देणार

वय —

व्यवसायः-

पत्ता --

(मूळ विरुध्द पक्षकार/तक्रार कर्ता )

यातील अपिलकर्ता विनंती पूर्वक निवेदन करतो की,

1. हे अपील ग्राहक संरक्षण कायदा कलम 15 प्रमाणे जिल्हा मंच यांचा तक्रार अर्ज क्र.(                ) मधील दिनांक          रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द दाखल करण्यांत आले आहे.

2. अपील दाखल करण्याची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

(येथे तक्रार अर्जातील वस्तुस्थिती थोडक्यात द्यावी व जिल्हा ग्राहक मंचाने काय निर्णय दिला त्याचा दिनांकासह व तपशील द्यावा.)

3. --------------------------- जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांनी दिलेला निर्णय खाली नमूद केलेल्या कारणामुळे योग्य,बरोबर व वैध नाही.

(या ठिकाणी एकाखाली एक अशी कारणे द्यावीत.)

(i) सुरुवातीला वस्तुस्थितीवर आधारित व नंतर

(ii) कायद्याच्या तरतुदीबाबत कारणे द्यावीत.

4. अपीलकर्त्याने सदर निर्णयाविरुध्द अन्यत्र अपील दाखल केले नाही.

5. जिल्हा मंचाने दिनांक रोजी निर्णय दिला. निर्णयाची प्रत/ माहिती अपीलकर्त्याला दिनांक रोजी मिळाली. तेव्हापासून 30 दिवसांचे आत अपील दाखल केले आहे. अतः अपील मुदतीत आहे.

(**विशेष सूचना** - अपील मुदतीत दाखल न केल्यास अपीलनाम्यासोबत विलंबमाफीचा अर्ज द्यावा. विलंब माफीचा अर्जाचा नमुना परिशिष्ट ब मध्ये दिला आहे, तो पहावा.)

6. अपील नाम्यासोबत अपीलकर्त्याने ----------- जिल्हा मंचाच्या तक्रार अर्ज क्र. (----------) मधील दिनांक --------------- रोजी दिलेल्या निर्णयाची प्रमाणित प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत.

7. अपीलनाम्यात नमूद केलेल्या कारणामुळे व अपिलाच्या सुनावणीच्या वेळी मांडण्यायंत येणा-या अन्य कायद्याच्या मुद्याचा विचार करुन हे अपील मान्य करावे व खाली विनंती कलमात नमूद केलेली दाद द्यावी, ही विनंती.

अ) जिल्हा मंचाने तक्रार अर्ज क्र. ( ) मध्ये दिनांक रोजी दिलेला निर्णय रद्दबातल ठरवावा. त्यात सुधारणा करावी.

ब) अपिलकर्त्यास जाब देणार क्र. (मूळ तक्रारकर्ता अगर विरुध्द पक्षकार क्र. -------) यांचेकडून ही दाद व नुकसान भरपाई द्यावी.

क) अपीलकर्त्याला विरुध्द पक्षकाराकडून या अपिलाचा खर्च द्यावा.

ड) राज्य आयोगाने इतर योग्य व न्यायाचे हुकूम करावेत.

8. अपीलकर्त्याने अपील नाम्यासोबत खालील कागदपत्रे जोडली आहेत.

(i) जिल्हा मंचाचा तक्रार अर्ज क्र. ( ) मधील दिनांक रोजीच्या निर्णयाची प्रमाणित प्रत.

(ii) अन्य शपथपत्र,दस्तऐवज,अधिकारपत्र,वकिलपत्र वगैरे.

ठिकाण -

दिनांक -

स्वाक्षरी

(अपीलकर्ता/वकील/प्रतिनीधी यांचे नाव व पत्ता )

## प्रतिज्ञालेख

मी अर्जदार श्री. वयः व्यवसायः कारणे प्रतिज्ञालेख लिहून देतो की वर अर्ज परिच्छेद क्र. ( ) ते ( ) मध्ये लिहिलेला संपूर्ण मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे व त्याच्या सत्यतेसाठी मी आज रोजी याखाली माझी स्वाक्षरी केली आहे.

ठिकाण -

दिनांक -

स्वाक्षरी

(अपीलकर्ता/वकील/प्रतिनीधी यांचे नाव व पत्ता)

## विशेष सूचना

(1) अपीलकर्त्याने अपीलनाम्यासोबत अपीलनामा अगर इतर कागदपत्राच्या दोन प्रती आयोगाकरीता तसेच प्रत्येक विरूध्द पक्षकारासाठी एक याप्रमाणे प्रती दाखल कराव्यात.

(2) अपीलनामा राज्य आयोगाकडे पोस्टाने पाठवावयाचा असल्यास वरील सर्व कागदपत्रे व त्यांच्या प्रती नोंदणी पध्दतीने व परत पावतीसह पाठवावे. सोबत अपीलकर्ते अगर त्यांचे प्रतिनीधी, जाब देणार यांची नावे व पत्रव्यवहाराचा सुस्पष्ट पत्ता द्यावा.